जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



❖ संस्थापक ❖

**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

☎ : (०२०) २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया एम.ए.

संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया बी.कॉम.

❖ वर्ष ४८ वे ❖ अंक ९ वा ❖ मे २०१७ ❖ वीर संवत २५४३ ❖ विक्रम संवत २०७३

## या अंकात

| | पान नं. |
|---|---|
| ● जिनेश्वरी : अध्याय १२ – हरिकेशी | १५ |
| ● मृत्यु को महोत्सव बनाएँ – जीवन से विदाई | २१ |
| ● कव्हर तपशील | २४ |
| ● सुखी जीवन की चाबियाँ – ज्ञानवृध्द की सेवा | ३१ |
| ● ऐसी हुई जब गुरुकृपा – ऊँची संगति में रह | ३५ |
| ● जादु का नाम है मुस्कान | ३९ |
| ● अति की गति | ४१ |
| ● आत्मिय निवेदन | ४१ |
| ● परज्ञान–अज्ञान/स्वज्ञान–ज्ञान | ४३ |
| ● सोडून द्या | ४४ |
| ● नए क्षेत्र में नए संतों का विचरण क्या संभव हो सकेगा ? | ४५ |
| ● आदमी व्यापार है | ४९ |
| ● श्री अर्जुनमाली | ६३ |
| ● चार्ज करें जिंदगी – सीखें कि कैसे पाएँ सफलता | ७३ |
| ● शरीर के प्रति कैसा अभियान | ७४ |
| ● चिंतन मोती | ७४ |
| ● नातेबंध | ७५ |
| ● कृतघ्नी न बनो..... | ७७ |
| ● प्रवचन मोती | ७९ |
| ● सन्मति तीर्थ में भगवती सूत्र पर द्वि दिवसीय सेमिनार | ८१ |
| ● हास्य जागृति | ८३ |
| ● हमारे गुरुदेव | ८५ |
| ● चिंतन मोती | ८६ |
| ● संवादिता की शहनाई | ८७ |
| ● महावीर स्वामी जन्मकल्याणक महोत्सव, पुणे | ९१ |
| ● पिंपरी–चिंचवड जैन महासंघ | ९२ |
| ● जैन सोशल ग्रुप पिंपरी–चिंचवड | ९३ |
| ● आनंदऋषिजी हॉस्पिटल, अहमदनगर एम.आर.आय. मशीन | ९५ |

- क्रेडाई अहमदनगर ९६
- आनंदऋषिजी हॉस्पिटल – आरोग्य शिबिर ९७
- सौ. सुर्यकांता कोठारी – पुरस्कार ९७
- स्व. चंचल चोरडिया स्मरणार्थ डायलेसिस मशीन ९९
- वाचकांचे मनोगत १०१
- दी पूना मर्चन्टस् चेंबरचे योगदान – प्रबंध १०३
- व्यसनमुक्ति अभियान, पुणे १०५
- सिलाई एम्पोरिओ, चिंचवड – उद्घाटन १११
- श्री. बंकटलालजी कोठारी, पुणे ११२
- मॉडर्न मॉंटेसरी इंटरनॅशनल प्री स्कूल – उद्घाटन ११६
- अभय संचेती, पुणे – पुरस्कार ११७
- सिध्दाचलम् चॅरिटेबल ट्रस्ट ११८
- विनोद शहा, पुणे – पुरस्कारांची हॅट्रिक ११९
- आचार्य जयंतसेन सुरीश्वरजी म.सा. निधन १२३
- विविध धार्मिक, सामाजिक व राजकिय बातम्या


जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित, एकूण अंक १२

❖ पंचवार्षिक वर्गणी –२२०० रु. ❖ त्रिवार्षिक वर्गणी – १३५० रु.

❖ वार्षिक वर्गणी ५०० रु. ❖ या अंकाची किंमत ५० रुपये.

❖ वर्गणी व जाहिरात रोखीने / On line / RTGS / AT PAR चेक / पुणे चेकने / मनीऑर्डर / ड्राफ्टने / 'जैन जागृति' नावाने पाठवावी.

● www.jainjagruti.in ● www.facebook.com/jainjagrutimagazine


हे पत्रक संपादक, प्रकाशक, मुद्रक व मालक श्री. संजय कांतीलाल चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, पर्वती, पुणे ९ येथे छापून ६२, ऋतुराज सोसायटी, पुणे ३७ येथे प्रसिद्ध केले. लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवायीसाठी पुणे न्यायालय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.



# जैन जागृति मासिकाचे ग्राहक बना !

- वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.
- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. ● 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

**सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !**

## जैन जागृति – वर्गणीचे दर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |

वर्गणी व जाहिरात – रोख / मनिऑर्डर / ड्राफ्ट / AT PAR चेक / पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**JAIN JAGRUTI - BANK ACCOUNT DETAILS**

Bank : STATE BANK OF INDIA Branch : Market Yard, Pune 37.

Current A/c No. : 10521020146 IFS Code : SBIN0006117

## जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजयः९८२२०८६९९७ सुनंदाः९४२३५६२९९१,** **www.jainjagruti.in**
**Email : jainjagruti1969@gmail.com** B **Press Email : prakash.offset@rediffmail.com**

## ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

❖ **भोसरी, चिंचवड, निगडी –** श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९१९४०९
❖ **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी –** श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१
❖ **गुरूवार पेठ, पुणे –** श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८
❖ **धनकवडी, पुणे –** श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५
❖ **मार्केटयार्ड, पुणे –** श्री. प्रमोदकुमार शांतीलालजी छाजेड, मो. : ९८८१८७३७१०
❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे –** निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७
❖ **सदाशिव पेठ परिसर, पुणे –** सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०
❖ **वडगाव शेरी, पुणे –** सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६
❖ **वडगाव मावळ, पुणे –** श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१
❖ **खडकी, पुणे –** श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४
❖ **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव –** श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२१३००५५९
❖ **दापोडी, पुणे –** श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६
❖ **नांदेड सिटी, पुणे –** श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६
❖ **दौंड, श्रीगोंदा –** श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२
❖ **घोडनदी, जि. पुणे –** श्री. पारसमलजी बांठिया, मो. : ९२२५५४२४०६
❖ **अहमदनगर –** श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०
❖ **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका –** श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०
❖ **सोनई –** श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७–२३१४६१, मो. ९८८१४१४२१७
❖ **औरंगाबाद –** श्री. सुभाषचंदजी मांडोत–फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१
❖ **मुंबई** खारघर– श्री. मदनलालजी गांधी–मो. ९८२०५३६७९३
❖ **नाशिक –** श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३–२३११००८,मो.९४२३९३९९९०
❖ **नाशिक –** मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५
❖ **बीड –** श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४
❖ **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२
❖ **श्रीरामपूर –**श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७
❖ **लासलगाव –** श्री. मनसुखजी साबद्रा, मो. : ९३२६३२५३४७
❖ **बारामती–** डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२–२२३८०७ मो.:९३२५००४९५०
❖ **अंमळनेर, जि. जळगाव –** श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७
❖ **जळगाव –** श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५
❖ **धुळे –** श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६
❖ **शहादा, जि. नंदुरबार –** श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६
❖ **इचलकरंजी, जि. कोल्हापूर –** श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८
❖ **मिरज, जि. सांगली –** श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८
❖ **कोल्हापूर –** सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१–२५४२२५३
❖ **सातारा व सातारा जिल्हा –** श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत

# ।। जिनेश्वरी ।।

**प्रवचनकार : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.** *(क्रमश:)*

## अध्याय १२ – हरिकेशी

**अग्निपथ बनले शीतपथ**

राजा शंख हा दीक्षित झाला व दीक्षा घेऊन तो तपस्वी बनला. शंख मुनी माधुकरी – भिक्षेसाठी निघाले विहार करता करता एका गावाकडे त्यांचे पाय वळले. पुन्हा तिथेच थबकले कारण त्या गावात जाण्यासाठी दोन रस्ते, दोन पायवाटा दिसत होत्या. संभ्रमावस्थेत असतांना त्यांना तिथेच पारावर एक ब्राह्मण बसलेला दिसला. त्याचे नाव सोमदेव होते. शंखमुनिंनी त्या ब्राह्मणाला विचारले ''बाबा रे कोणता रस्ता गावाकडे जातो ?'' ब्राह्मणाला त्याची थट्टा करण्याचे मनात आले, त्याच्या मनात रावण जन्मला. त्याने मुनींच्या अज्ञानाचा दुरूपयोग केला. गावात जाणाऱ्या मार्गांपैकी एक मार्ग शीतपथ होता, थंड होता व एक मार्ग अग्निपथ होता. तो सदैव तापलेला असायचा. रात्रीसुध्दा त्यावर पाय ठेवला तरी चटका बसत असे.

आणि सोमदेवने कुबुद्धिने अग्निपथाकडे इशारा केला 'हा रस्ता गावाकडे जातो' शंखमुनि त्या रस्त्यावर चालायला लागले आणि ब्राह्मण त्यांची फजिती पाहायला उत्सुक झाला. ब्राह्मणाला वाटले अग्निपथावरून चालताच मुनींचे पाय पोळतील व ते थयथय नाचायला लागतील व पळून जातील. पण शंख मुनींची पाऊले अशी होती की ज्या वाटेवर ती पडायची तेथील कांटे फुले बनून जायची शंख मुनींनी अग्निपथावर पाऊलच ठेवले नाही तर आरामात आनंदात चालु लागले. सोमदेवाला आश्चर्य वाटले. 'अरे ! कमाल झाली. या रस्त्यावर कोणी पाऊल ठेवू शकत नव्हते. हा आरामात चालत आहे.' सोमदेव ब्राह्मणाने भीत भीतच त्या रस्त्यावर पाय ठेवून पाहिले तर तो रस्ता अगदी शीतल-थंड झाला होता.

सोमदेव ब्राह्मणाला पश्चाताप झाला. अशा देवमाणसाचा मी अपमान-अवमान केला. त्याने मुनींचे पाय धरले व गयावया करू लागला की, ''भगवंता माझ्या अपराधाला क्षमा करा, धन्य तुमची पावले धन्य तुमचे तप ! धन्य तुमची साधना ! धन्य तुमचे जीवन !!!'' मुनींची श्रेष्ठता मान्य करताना सोमदेव म्हणाला ''भगवंता मला क्षमा करा. आपल्या पावलात जे सामर्थ्य आहे ते मलाही प्रदान करा. माझी पाउले अशी करा मी जिथे पाय ठेवेन तिथे गारवा निर्माण होईल.''

आपली पण पावले कशी आहेत ? अग्निपथाला शीतपथ करणारी आहेत की शीतपथाला अग्निपथ करणारी ? शांतीत अशांती करणारी की अशांतीत शांती करणारी ? दु:खी कुटुंबाला सुखी करणारी की सुखी कुटुंबाला दु:खी करणारी ? भगवंत सांगतात अरे माणसा, असे जीवनात जगा, तुम्ही ज्या मार्गावरून वाटचाल केली ती वाट कल्याणकारी बनेल, अनेकांना सफलतेची वाट दाखवून देईल.

आजच विचार करा की आपल्या हाताने पणत्या तेवत ठेवायच्या की फटाके फोडायचे ? आपले हात कोणाच्या तरी जीवनात अंधार पसरविण्यासाठी पुढे करायचे की अंधार दूर करण्यासाठी ? एखाद्याच्या जीवनाची ज्योत पेटविण्यासाठी हात पुढे करावा की

ज्योत विझविण्यासाठी ? याचे उत्तम उदाहरण देता येईल परम पिता भगवान महावीर यांनी त्यांचे परम शिष्य इंद्रभुती गौतमांना आपल्या निर्वाण समयी एका ब्राह्मणाजवळ पाठविले. ज्या ब्राह्मणाच्या जीवनात अंध:कार व्यापला होता. महावीर गौतमांना म्हणाले 'जा त्या ब्राह्मणाचे जीवन ज्ञानाच्या प्रकाशाने उजळून टाक !'

आपणही विचार केला पाहिजे आपले शब्द, आपली दृष्टी, आपली पावले, आपले आचरण असे असावे की समोरच्याचे जीवन प्रकाशाने न्हाऊन निघावे, अंधकाराचे अज्ञानाचे साम्राज्य संपावे. जीवनाची हकीकत पहा एक सून घरात येते घराच्या दावानलाला नंदनवन बनवून टाकते व एखादी येते व आनंदाने भरलेल्या नंदनवनाला भडभडणारे दावानल बनवून टाकते.

आपण पुन्हा कथावस्तुकडे वळूया मुनींच्या पवित्र पावलानी अग्निपथाला शीतपथ बनवून टाकले. सोमदेव ब्राह्मणाने स्वत:ची चूक मान्य केली, मुनीची क्षमा मागितली, अपराधांची स्वीकृती व आराधनेची कृती सुरू करत सोमदेवानी मुनीच्या चरणी प्रार्थना केली, माझी पावले अशीच करा की माझे चरण कुणाच्या तरी सदाचरणासाठी निमित्त बनावे. माझी नजर, माझे आचरण, माझे सर्व जीवन असे बनावे की मी जिथे जाईन तिथे आगीचे रूपांतर बागेत होईल. माझी वासना उपासना बनावी. भगवंत कृपा करा, मला आपला शिष्य स्वीकार करा, मला दीक्षित करा.

**अहंकाराचे विघातक सुत्र**

सोमदेवानं दीक्षा घेतली व संन्यासाचे जीवन जगू लागला. संन्यास घेतला तरी त्याचा ब्राह्मण कुळाचा अहंकार कायम होता. **संसारात राहून केलेला अहंकार तेवढा विघातक नाही जेवढा संयमात राहून केलेला अहंकार,**

उदा. दुकानात बसून दिलेल्या शिव्यांनी बदनामी होत नाही जेवढी देवळात बसून दिलेल्या शिव्यांनी होते. हॉटेलात बसून उष्टे टाकले तर काही वाईट नाही पण हरिनाम सप्ताहातील जेवणात उष्टे टाकले तर जास्त अपमान वाटतो. म्हणूनच भगवंत सांगतात संन्यस्त झाल्यावर अहंकाराने त्रस्त होणे जास्त दुसह्य आहे.

अहंकाराचे हे सर्व विदीत सूत्र आहे. ज्या गोष्टीचा अहंकार केला त्या गोष्टीपासून तो वंचित झाल्याशिवाय राहणार नाही. हा निसर्गाचा नियम शाश्वत सिध्दांत आहे. सौंदर्याचा अहंकार केला तर सौंदर्य निघून जाते, धनाचा अहंकार केला तर कंगाल होणारच, कुळाचा गर्व केला तर नीच कूळच मिळणार हे गर्वाचे, अहंकाराचे सुत्र लक्षात ठेवा. सन्मानाचे रूपांतर अपमानात, सत्काराचे रूपांतर तिरस्कारात होते ते केवल अहंकारामुळेच.

सोमदेवचेही असेच झाले संन्यास घेतल्यानंतरही ब्राह्मण कुळाचा अहंकार गेला नाही व परिणाम स्वरूप पुढच्या जन्मी त्याला नीच कुळात जन्म घ्यावा लागला. केवळ जातीनेच नीच नाही तर रूपाने सुध्दा कुरूप व विद्रूप, हरिकेशी नाव होते त्याचे, ज्याचे दिसणे, वागणे आणि जगणे सगळेच विद्रूप असेल तर कल्पना करा, त्याचे जीवन कसे असेल ?

**हरिकेशी – स्व: चा शोध आणि बोध**

लहानपणी मित्रांबरोबर खेळ खेळतांनाही त्याला मेळ बसवता येत नाही. विचित्र स्वभावामुळे एकदा मित्रांनी त्याला खेळातून बाहेर काढले. छोटा हरिकेशी बाजूला उदास बसला होता. झालेल्या अपमानाची व अवहेलनेची मनात आग पेटलेली होती. तेवढ्यात त्याने पाहिले एक विषारी साप तेथे निघाला व लोकांनी व मित्रांनी त्याला दगड-बुटांनी ठेचून मारून टाकले व पुन्हा खेळ सुरू झाला आणि थोड्याच वेळात एक बिनविषारी साप निघाला. ज्याला आपण गांडूळ म्हणतो. मित्रांनी व लोकांनी त्या गांडूळाला इजा न पोहचवता अलगद उचलून बाजुला ठेवून दिले.

हरिकेशीनी दोन्ही घटना पाहिल्या ज्या सापाला ठेचून मारले त्यालाही पाहिले व ज्या सापाला उचलून बाजूला ठेवले ते ही पाहिले. हरिकेशीच्या जीवनाची एकच विशेषता होती मागच्या जन्मीही होती व या

जन्मीही होती. घटना बाहेर घडायची पण त्याच्या अंतरंगात बदल घडवून जायची. हरिकेशी विचार करू लागला, अरेच्या ! लोक सापाला मारत नाही तर त्याच्या चरित्राला वागणूकीला मारतात. पहिला साप विषारी होता म्हणून मारला गेला. दुसरा साप बिनविषारी होता म्हणून त्याला लोकांनी उचलून निर्जनस्थळी ठेवले. तसंच लोक मला हिणवत नाहीत, मला मारत नाहीच, माझा तिरस्कार करीत नाहीत तर माझ्या अंतरंगात जे दुर्गुणांचे, दुर्विचारांचे, दुर्वर्तणूकीचे विष आहे त्याला हिणवतात, मारतात.

हरिकेशीला दिव्यशोध झाला व त्याने अंतरंगातील सर्व विष काढून टाकण्याचा निर्धार केला. हरिकेशी आता स्वत:चा शोध घेऊ लागला हे विष, हे दुर्गुण हे दुराचरण माझ्यात कोठून आले ? कोठून आले ?... आणि गतजन्म डोळ्यासमोर दिसू लागला. यालाच जातिस्मरण ज्ञान म्हणतात.

**अहंकाराचा अंत बनवितो भगवंत**

भगवंत सांगतात दुसऱ्यांच्या चुका पाहण्यात, शोधण्यात जन्म वाया जातो. आपली चूक शोधायचा प्रयत्न केला तर जन्माचे सार्थक होते.

हरिकेशीच्या लक्षात आले की रंग, रूप, जात हे गत जन्मीचे परिणाम स्वरूप असले तरी वर्तमान चरित्र सुधारणे माझ्याच हाती आहे. स्वत:चे संचित कसे चांगल्या गोष्टीपासून वंचित करीत आहोत याची हरिकेशीला जाण आली. माझ्या अंतरंगातील विष केवळ याच जन्माचे नाही हे विष मी त्या जन्मात गोळा केले ज्या जन्मात अमृत संग्रहित करण्याची संधी होती. मी त्यावेळी काटे वेचली आहेत ज्यावेळी फूल वेचण्याची सुवर्णसंधी हातात आली होती, मी मातीच जमा करीत आलो. परंतु आता मनात उत्कृष्ट भावना निर्माण झाली की हे जन्मजन्मांतरीचे विष धुवून काढायचे आहे. त्यासाठी त्याने भगवान महावीरांच्या शासनातसंन्यस्त व्हायचे ठरवले भगवंताच्या शरणात येऊन उग्र तपश्चर्या चालू केली अहिंसा तप संयमाच्या त्रिवेणीत तो आकंठ बुडाला त्याचे ते उग्र तप दिव्य साधना पाहून कालांतराने काही देव त्याचे पूजारी झाले.. यक्ष पुजारी बनले.

पुज्य बनण्याचा मार्ग आहे अहिंसा, संयम, तपाचे दिव्य आचरण,

श्रोत्यांनो, किती दिवस तुम्ही स्वर्गात असलेल्या देवांची भक्ती कराल ? देवता अहिंसक संयमी आणि तपस्वींची आराधना करतात. तुमच्याही जगण्याची रीत अशी करा की देवताही तुमची आराधना करतील. अंतरंगातील अहंकाराचा जेव्हा अंत होतो तेव्हाच आपण कुणासाठी भगवंत होतो.

**भद्राद्वारा हरिकेशी मुनींचा अपमान**

एकदा हरिकेशी मुनी वाराणसी नगरीत एका यक्षाच्या मंदिरात ध्यानमग्न अवस्थेत उभे होते. तपामुळे त्यांचे शरीर अगदी जर्जरित झाले होते. कौशलीक राजाची राजकन्या भद्रा त्या मंदिरात यक्षाची पूजा करण्यासाठी आली. यक्षाची पूजा केली आणि यक्षाला प्रदक्षिणा घालताना तिने एका शुष्क वृक्षासारखा एक कुरूप मनुष्य घाणेरड्या कपड्यातील, ध्यान अवस्थेत पाहिला. तिला त्याची घृणा, किळस आली आणि ती त्या मुनीवर थुंकली. यक्षाने तिचे हे कृत्य पाहिले व त्याने विचार केला ही तर माझी पूजा करते आणि माझ्या पुजनीयाची, श्रध्देयाची, मी ज्यांची पूजा, भक्ती करतो, त्यांचा ही तिरस्कार करते. घृणा करते. मी ज्यांचा सन्मान करतो, ही त्यांचाच अपमान करते. यक्षाने या अपमानाचा बदला घेण्याचे ठरवले आणि त्याने भद्रा राजकन्येच्या शरीरात प्रवेश केला तुमच्या शब्दात सांगावयाचे झाले तर भूतबाधा झाली. भूतबाधा झाली आणि खेळ सुरू झाला. राजाने मांत्रिक, तांत्रिक बोलावले आणि आतील यक्ष बोलू लागला. हिने माझ्या आराध्याचा माझ्या श्रध्देयाचा अपमान केला आहे हिला जिवंत रहायचे असेल तर एकमेव उपाय आहे. हिने माझ्या श्रध्देयाची पत्नी व्हावे. व्यक्ती मृत्युसमोर हतबल होऊन जातो.

राजा सर्व मंत्री परिषदेला घेऊन हरिकेशी मुनीकडे

गेला आणि हात जोडून प्रार्थना केली '' हे मुनीवर आपण माझ्या कन्येला आपली पत्नी म्हणून स्वीकार करावा.'' हरिकेशी मुनींनी आपले ध्यान पूर्ण करून डोळे उघडले आणि बोलु लागले ''या कन्येशी मला काहीच देणे-घेणे नाही मी ब्रह्मचर्य व्रताचा अंगीकार केलेला आहे त्यामुळे हिला स्पर्शसुध्दा करण्याचा प्रश्न उद्‌वत नाही.'' आता राजा द्विधा अवस्थेत होता. मुनी कन्येला स्वीकारीत नाही आणि यक्ष शरीर सोडत नाही. राजा विचारात पडला. आता करायचे तरी काय?

तेव्हा राजपुरोहित रूद्रदेव सोमदेवाने सल्ला दिला. 'राजे ऋषीमुनी व ब्राह्मण समकक्ष असतात. कन्या ब्राह्मणाला समर्पित करावी.'

**ब्राह्मणाकडून हरिकेशीला भिक्षेचा नकार**

राजाने तो सल्ला मान्य केला आणि रूद्र-पुरोहितालाच आपली कन्या प्रदान केली. भद्रा त्याच्याबरोबर राहू लागली.

एकदा पुरोहिताच्या अंगणात यज्ञ चालला होता योगायोगाने हरिकेशी मुनी महिनाभराच्या निराहारी उपवासाचे पारणे होण्यासाठी भिक्षा घ्यायला त्याच अंगणात आले. यज्ञासाठी भरपूर भोजन तयार केलेले होते. तेथे हरिकेशी मुनींनी प्रवेश केला. त्यांचे ते मळके कपडे व कृश शरीर पाहून तेथील सर्व लोक त्यांचा उपहास करू लागले. ''हा कोण येत आहे ? अदर्शनीय विद्रूप, बीभत्स रूपाचा हा कोण येत आहे?'' त्यांनी मुनींना विचारले ''तू इथे का आला आहेस ? नीघ येथून चालता हो.''

हरिकेशी मुनींनी अत्यंत सौम्य शब्दात उत्तर दिले, ''मी भिक्षाजीवी आहे. माझे जीवन मी माधुकरी मागुनच चालवतो. इथे सुलभ अन्न प्राप्त होईल म्हणून मी घेण्यासाठी आलो आहे. आपण मला भिक्षा दान करून आपले पुण्य वाढवावे.'' ब्राह्मण म्हणाले, ''नाही!'' हे शक्य नाही. कारण येथील सर्व अन्न फक्त ब्राह्मणांसाठीच आहे. तुझ्यासाठी नाही.'' तेव्हा मुनीने पुन्हा समजावले, ''शेतकरी जेव्हा बी पेरतो तेव्हा उंचावरही पेरतो व जमिनीवरही पेरतो, तसेच आपणही ते अन्न ग्रहण करावे व मलाही द्यावे पुण्य संचय करावे.''

ब्राह्मणांनी पुन्हा मुनीला बजावले, ''नाही. आम्हाला माहीत आहे पीक कोठे येते ते तुला दान केल्याने आम्हाला कधीही फळ मिळणार नाही, व्यर्थच जाणार.'' मुनींच्या शरीरात वारा करणाऱ्या यक्षाने मुनींच्या तोंडाद्वारे आपले शब्द वापरले की, ''तुम्ही तर केवल शब्दांचा भार गाढवासारखा वाहत आहात. वेदांचा अर्थ काय जाणता तुम्ही ? क्रोध, मान आदी षड्रीपूंमध्ये ज्यांचे जीवन आसक्त आहे ते पापक्षेत्र आहे, पुण्यक्षेत्र नाहीच ...''

हे बोलणे चालू असतानाच तेथील अध्यापकाने विद्यार्थ्यांना बोलावून म्हटले, ''बघा हा प्रतिकूल बोलतोय आपल्याच अंगणात येऊन आपल्याला अपशब्द बोलतोय, मारा त्याला'' आणि ते सगळे हरिकेशीला मारू लागले त्यांना मारायला चालू केल्यावर यक्षानेही उपद्रव द्यायला सुरूवात केली. तोपर्यंत भद्रा बाहेर आली. तिने पाहिले हे काय चालले आहे ? या तपस्वीला का मारत आहेत ?

**दुराचारी बनले सदाचारी**

तिने हरिकेशीला ओळखले व गतजीवनातील घटित त्या सर्वांना समजावले, कृपया यांना मारू नका. यांना मारण्याचे पातक करणे खूपच घातक आहे. भद्राने त्यांना सत्य सांगितले तेव्हा भद्राच्या सांगण्यावरून पुरोहित मुनीचे गुणगाण करू लागले. तोपर्यंत यक्षाने त्या पुरोहिताला पुरते पीडित दंडीत केले होते. पण जेव्हा ते मुनींचे गीत गाऊ लागले तेव्हा यक्षाने त्रास देणे थांबवले.

पुरोहित मुनीचे गीत गातांना सांगू लागला की, ''तुम्ही ऋषीमुनी तर कधी कुणाबद्दल राग धरीत नाही'' तेव्हा मुनींनी सोज्वळ भाषेत उत्तर दिले की, ''भुतकाळात, वर्तमानकाळात किंवा भविष्यकाळातही माझ्या मनात तुम्हा सर्वांबद्दल कोणत्याही प्रकारे द्वेषभाव, रोष किंवा राग नाही. हे जे काही झालेले आहे, ते मी नाही तर माझ्या सेवेत राहणाऱ्या यक्षाने केले आहे.''

मुनिंची उदारता व दिव्य पाहून ब्राह्मण पुरोहित नतमस्तक झाले आणि मुनिंना म्हणाले, ''मुनिवर आपण श्रेष्ठतम आहात, पूजनीय आहात. आम्ही तुम्हाला शरण आलो आहोत आमच्यावर कृपा करा. महानुभाव, आम्हाला माफ करा.''

येथे महानुभाव हा शब्द उच्चारण्यात आला आहे. या शब्दाचा अर्थ तेवढाच गहन आहे. **ज्याच्यात भले करण्याची कल्पनातीत शक्ती असते, ज्याची आपण कल्पनाही करू शकत नाही असे भले करण्याचे सामर्थ्य ज्यांच्यात असते त्याला महानुभाव म्हणतात.** असे महानुभाव वंदनीय व्यक्ती निंदनीय व्यक्तींच्या भक्तीभावाचा स्विकार विना तिरस्काराने ग्रहण करतात.

हरिकेशी मुनी ब्राह्मण - पुरोहिताना दिलेले अन्न ग्रहण करतात. यक्षही प्रसन्न होतो. वातावरण बदलून जाते.

**दुराचारी जेंव्हा सदाचारी बनतो तेंव्हा निसर्गही आनंद साजरा करतो. सदाचारी जेव्हा दुराचारी बनतो निसर्गही रडू लागतो.** जेव्हा दुराचारी पुरोहित प्रभूचा पुजारी बनला तेव्हा हरिकेशी मुनीने प्रसाद-पसायदान देण्यास प्रारंभ केला.

**हरिकेशी मुनींचे पसायदान**

किं माहणा ! जोइसमारंभंता, उदएण सोहिं बहिया विमगहा ?

''तुम्ही हा बाह्य अग्नी पेटवून यज्ञ हवन करून काय साधत आहात ? कशाची आहूती देत आहात ? त्याने काय कल्याण साधणार ?'' बंधूनों भगवंतही आपणास विचारतात की बाबा रे ! वास्तुशांती गृहशांती करताना होम-हवन करता, यज्ञ करता, अग्नी पेटवता, संपूर्ण घर तापवून गृहप्रवेश करता तर घरातील लोकांना शांती कोठून मिळणार ? **स्वयंपाकासाठी अग्नी पेटवणे हे गृहस्थाचे कर्म आहे परंतु आपल्याच घरात यज्ञ, होम हवन करणे ही अहिंसकाची जैनांची परंपरा नाही. ही परंपरा मानवाची नाही, सदाचाराची नाही. हे पूर्णपणे निसर्गाविरूध्द आहे. तुम्ही जैन असाल किंवा नसाल परंतू जे पूर्ण अवैज्ञानिक आहे, अनैसर्गिक आहे, जे शुध्दतत्वानुसार निर्बधींत आहे असे होमहवन करून तुमची शांती, सिध्दी अबाधीत राहू शकत नाही.**

बंधूंनो मंत्रांनी शांती मिळली असती तर आज जगात न्यायालये चालली नसती. दूसऱ्यांना शांती द्याल, तुम्हाला शांती मिळेल. तुम्ही दुसऱ्याला जाळाल, पोळाल तर तुम्हाला विझवण्यासाठी, शांतीसाठी कोण येणार ? इतक्या जीवांना दु:ख देऊन तुम्हाला सुख कसे लाभेल? पुढे अगदी स्पष्ट शब्दात हरीकेशी मुनी वदले.

**कुसं च जूवं तणकट्ठमग्गिं, सायं च पायं उदगं फुसंता ।**

**पाणाइ भुयाइ विहेडयन्ता, भुज्जो वि मन्दा! पकरेह पावं ।।**

''यज्ञात कुश, गवत टाकणे, जव टाकणे हे त्या जीवांना दु:खी कष्टी करणे आहे आणि असे पातक करणाऱ्याला स्नातक अर्थात हुशार म्हणता येणार नाही. **पापाच्या वाटेने सुखाची साधने मिळवितात पण सुख मिळत नाही.**

ब्राह्मण चमकले. आपली चूक त्यांना अवगत झाली. त्यांनी मुनींना हात जोडून विचारले ''मुनिवर आता आम्ही काय करावे ? कोणत्या प्रकारे यज्ञ करावे. पाप कर्मे कशी टाळावीत ? कसे जगावे ?''

''सहा प्रकारच्या जीवांची हिंसा न करता त्यांना पीडीत न करता असत्य, चौर्य, अब्रम्ह, क्रोध, मान, माया, लोभ यांचा त्याग करून जे जीवन याग करतात ते पापाकर्मापासून मुक्त होतात. पाचही इंद्रियांना नियंत्रित करीत, पाच पापद्वारांना बंद करून आश्रवापासून पापाची भक्ती न करता जे या देहाची आसक्ती सोडतात त्यांचे जीवनच अखंड ज्योती बनते, स्वयंभु यज्ञ बनते.''

ब्राह्मण विचारतात ''मुनिवर, आपला अग्नी कोणता ? त्यात समीधा कोणती टाकता ? तुमचे मंत्रपाठ कोणते आहेत ? तेव्हा मुनी प्रबुध्दपणे उद्गारतात.

**तवो जोई जीवो जोइठाणं, जोगा सुया सरीरं कारिसंगं ।**

**कम्मेहा संजमजोगसन्ती, होमं हुणामि इसिणं पसत्थं।।**

''तपाची ज्योती आहे जीव हीच वेदिका आहे. अग्नीकुंड आहे, मन-वचन, कायेचा पळीचमचा आहे. शरीररूपी इंधन आहे. अशा या यज्ञात संयम-आचारणाचा शांतीपाठ आहे.''

पुढे ब्राह्मण जिज्ञासापुर्वक विचारतात, ''अहो यक्षपुजीत संयमी मुनीवर, आपण स्नान कोठे करता ? आपले जलाशय कोणते आहे ? शांतीतिर्थ कोणते आहे ? आणि मुनी म्हणाले ''धर्म माझे जलाशय आहे, ब्रह्मचर्याचे शांतीतिर्थ आहे. तिथे मी व्याकुळतारहीत होऊन आत्म प्रसन्नतेच्या शुभ लेश्येत, भावधारेत निरंतर स्नान करीत सर्व पाप-दोषांना धुवून टाकतो.

ब्राह्मणांनी पुढचा प्रश्न विचारला, ''हे मुनीवर साधना सिध्दीसाठी काय करावे ?''

मुनींनी उत्तर दिले, ''साधना करण्यापूर्वी निश्चित करावे की, साधना कशासाठी करायची आहे. **भौतिक असो वा अन्य कोणतीही कामना असो ज्याच्यासाठी तुम्हाला साधना करायची आहे ती प्रभूशी जोडून द्या, ती धर्माशी जोडा.ज्यामुळे ती कामना पूर्ण झाल्यावर संसारात लिप्त न होता प्रभुशी जोडलेले रहाल. प्रभूचा वियोग होणार नाही.**'' हा साधना सिध्दीचा पूर्वाचरीणी मार्ग. याचे सर्वात मोठे उदाहरण श्रीपाल-मैनासुंदरी संतांनी गुरूजनांनी मैनासुंदरीला साधना देते वेळेस एवढेच सांगितले इष्ट मनात धारण करून, जे तूला हवे त्याच्या प्राप्तीचा संकल्प करून तू नवपदाची आराधना करशील तर नवपदाची शक्ती त्या कामनेची पूर्ती तर करेलच पण तुला त्या कामनेत बुडू देणार नाही.

श्रोत्यांनो, प्रभुसमवेत चालतात तर संसाराचा आनंद घेत असतानांही संसारात मुक्त होऊन जगू शकता. जर प्रभुला सोडून चाललात तर जीवन चालले आहे तसेच जाईल. जसे ब्राह्मणांच्या जीवनात बदल झाले तसे आपल्याही जीवनात होवो. या मंगलभावनेसह पुढचा अध्याय. *(क्रमशः)* ●

मृत्यु को महोत्सव बनाएँ

# जीवन से विदाई

**लेखिका : साध्वी-श्री युगुल निधी-कृपा**

इस संसार से विदाई का नाम 'मृत्यु' है किन्तु जिसकी विदाई कर्मों को समाप्त करके होती है उसकी विदाई को 'मुक्ति' कहा जाता है। शरीर-सम्बन्ध का नाम जन्म है और विसम्बन्ध का नाम मृत्यु है। जन्म एक नियति है, एक संयोग है। मृत्यु व्यक्ति के पुरूषार्थ की स्वतन्त्र चेतना का परिणाम है।

किसी के लिए मृत्यु त्रासदायक है तो किसी के लिए आशीर्वाद रूप है। **जैसे दुष्कर्म करने वालों के लिए मौत दुखदायक और सत्कर्म करने वालों के लिए आशीष रूप है।**

'मेरी मृत्यु कैसी होनी चाहिए ?' इस संदर्भ में मनुष्य कभी चिन्तन नहीं करता। 'मृत्यु' शब्द की हम सिर्फ चर्चा करते हैं.... जैसे, निधन किसका हुआ ? कब हुआ ? कैसे हुआ ? इत्यादि।

अक्सर लोग मरने वाले व्यक्ति के सम्बन्ध में बातचीत करके उस घटना को भूला देते हैं या उसके विस्तार में खो जाते हैं.... या 'आज तक मौत से कोई बचा नहीं' यूँ कहकर मृत्यु को सार्वजनिक मान लेते हैं और उसके प्रभाव को कम कर देते हैं।

दरअसल इस सत्य का मनुष्य को बार-बार चिन्तन करना चाहिए .... मेरी मृत्यु होगी .... कब तक मुझे बार-बार संसार में मरना पड़ेगा... ? मैं अमरत्व को कब और कैसे प्राप्त करूँगा ? इस बात का चिन्तन बार-बार जगाना क्योंकि बिना जीवन को समझे मौत समझ में नहीं आएगी।

जब हम मृत्यु के विषय में चिन्तन करेंगे तब आत्मा का विचार जागेगा ... मृत्यु से अमृत की ओर जाने का पुरूषार्थ सफल होगा।

बृहदारण्यक में मानव प्रभु से प्रार्थना करता है, **'मृत्योर्मा अमृतं गमय'** अर्थात् हे प्रभु ! मुझे मृत्यु से अमृत की ओर ले चलो। ●

## कव्हर तपशील - मे २०१७

❖ **आनंदऋषिजी हॉस्पिटल एमआरआय मशीन**

अहमदनगर येथील आचार्य आनंदऋषिजी हॉस्पिटलमध्ये एमआरआय. या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने विकसित असलेल्या मशीनचे लोकर्पण दानवीर. प्रसिध्द उद्योजक व पारस उद्योग समुहाचे संचालक माणकचंदजी प्रेमराजजी बोथरा व परिवार, धनराजजी श्रीश्रीमाळ, सौ. कमलबाई श्रीश्रीमाळ व परिवार व सी.ए. रमेश फिरोदिया, सौ. सविता फिरोदिया व परिवार तसेच श्री फुलचंदजी बाठिया, सौ. चंचलबाई बाठिया व परिवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प.पू. श्री आदर्शऋषिजी म.सा., युवाचार्य श्री. महेंद्रऋषिजी म.सा. आदी साधूसाध्वीगण, जैन सोशल फेडरेशनचे सर्व पदाधिकारी व अनेक मान्यवर उपस्थित होते.

❖ **स्व. चंचल चोरडिया स्मरणार्थ डायलेसिस मशीन**

जैन जागृतिचे संस्थापक स्व. श्री. कांतीलालजी फुलचंदजी चोरडिया यांच्या पत्नी श्रीमती चंचल के. चोरडिया (वय ८०) यांना दि २७ नोव्हेंबर २०१६ रोजी समाधीमरण लाभले. त्यांच्या स्मरणार्थ प्रवीण, संजय व चोरडिया परिवारा तर्फे वडगाव शेरी येथील कोठारी चॅरिटेबल ट्रस्टच्या डायलिसिस सेंटरला एक डायलेसिस मशीन भेट देण्यात आली.

यावेळी कोठारी चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक श्री. प्रफुल्लजी कोठारी, जैन जागृतिचे संपादक श्री. संजय चोरडिया, श्री. प्रवीण चोरडिया, सौ. आशा प्रवीणजी पगारिया, नगरसेवक श्री. प्रवीणजी चोरबेले, श्री. चंद्रकांतजी पगारिया, श्री. राजेंद्रजी बांठिया, वडगावशेरीचे अध्यक्ष श्री. सुरेशजी डागलिया, श्री. शांतीलालजी बोरा श्री. ओमजी ओसवाल इ. मान्यवर उपस्थित होते.

❖ **आनंदतीर्थ, चिचोंडी – वर्षीतप पारणा**

परमश्रध्देय आचार्य भगवंत श्री आनंदऋषिजी म.सा. यांची जन्मभूमि चिचोंडी, जि. अहमदनगर येथे २९ एप्रिल रोजी भव्य वर्षीतप पारणा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवास मुनीश्री लोकेशऋषिजी, श्री श्रेयांसऋषिजी, साध्वी श्री प्रीतिदर्शनाजी म.सा. आदी २० ठाणा व हजारो लोकांच्या उपस्थितीत पारणा महोत्सव संपन्न झाला. या वेळी संस्थेचे पदाधिकारी C.A. श्री. सतीशजी सुराणा, श्री. सुभाषजी मुथ्था, श्री. विलासजी पालरेशा, श्री. रविंद्रजी नहार, श्री. सुरेंद्रजी संचेती, श्री. विजय समदडिया, श्री. लालचंदजी कर्नावट, श्री. संजय चोरडिया इ. उपस्थित होते.

❖ **''मॉडर्न मॉंटेसरी इंटरनॅशनल'' प्री स्कूल – उद्‌घाटन**

पुणे – ''मॉडर्न मॉंटेसरी इंटरनॅशनल'' प्री स्कूल यांनी यशस्वीरित्या पहिल्याच वर्षी कार्य चालू केल्यानंतर, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये बिबवेवाडी व खराडी येथे दोन नवीन केंद्र सुरु केली आहेत. या केंद्राचे उद्‌घाटन एसीपी भानुप्रताप बर्गे, आ. माधुरीताई मिसाळ, ॲड. अभय छाजेड, बाळासाहेब अनासकर, श्रीनाथ भिमाले, प्रवीण चोरबेले, संजीव शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक श्री. अल्पेशजी भन्साळी, सौ. एकता भन्साळी, श्री. अनिल भन्साळी, सौ. लता भन्साळी व भन्साळी परिवार व अनेक मान्यवर उपस्थित होते.

❖ **श्री. शांतीलालजी मुथा, पुरस्कार**

महाराष्ट्र दिनानिमित्त राजभवन मुंबई येथे झालेल्या भव्य समारंभात सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य करणारे श्री. शांतीलालजी मुथा यांना महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. सी. विद्यासागर रॉय व

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेन्द्रजी फडणवीस यांच्या हस्ते ''महाराष्ट्र वैभव'' हा सन्मान देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते.

❖ **सौ. सुर्यकांता कोठारी – पुरस्कार**

अहमदनगर येथील धार्मिक व सामाजिक कार्यात अग्रेसर सौ. सुर्यकांता रसिकलालजी कोठारी यांना गुरु आनंद रजत स्मृति वर्षानिमित्त आयोजित खुली किताब स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे रु. ७१०००/- बक्षीस मिळाले आहे.

२८ मार्च रोजी आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या २५ व्या पुण्यस्मृतिदिनी झालेल्या शिखर महोत्सवात सौ. सुर्यकांता कोठारी यांना पुरस्कार देण्यात आला.

❖ **श्री. अभयजी संचेती – आदर्श व्यापारी पुरस्कार**

पुणे – मार्केट यार्ड येथील ज्येष्ठ व्यापारी अभयजी बन्सीलालजी संचेती यांना आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते श्री श्री रविशंकर व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आदर्श व्यापारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातर्फे अण्णाभाऊ साठे सभागृह येथे पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

❖ **श्री. विनोद कां. शहा – पुरस्कार**

पुणे येथे जे.एस.जी.आय एफ च्या एम.आर.सी – महाराष्ट्र रिजनचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. या महाराष्ट्र राज्यस्तरिय अॅन्युअल अॅवॉर्ड सेरिमनीमध्ये राज्यातील ५८ ग्रुप्सचा समावेश होता. सर्व कॅटॅगरी मध्ये जोरदार स्पर्धा होती. पुणे मिड टाऊनचे अध्यक्ष विनोद कां शहा यांना तीन नामांकित प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आले.

❖ **श्री. जयप्रकाशजी राका, चिंचवड – सन्मान**

चिंचवड येथील प्रसिध्द उद्योजक श्री. जयप्रकाशजी रांका यांची श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ चिंचवड स्टेशनच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. मित्रपरिवार व सकल जैन समाजाच्या वतीने जाहिर सत्कार करताना उद्योजक श्री. जयकुमार चोरडिया, प्रकाश जैन, सुभाष ललवाणी, दिलीप चोरडिया, संतोष कर्नावट, शामसुंदर बोरा, प्रकाश मुनोत, राहुल पारख, मदन कांकरीया, राजेंद्र रांका, अशोक मंडलेचा, मनोहर दिक्षीत आदि मान्यवर.

❖ **सिलाई एम्पोरिओ, चिंचवड – उद्घाटन**

सी.जी. लाईफस्टाईलच्या चिंचवडमधील ''सिलाई एम्पोरिओ'' या भव्य शोरुमचा शुभारंभ पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार श्री. गिरिषजी बापट व संचालक दादा गुजर व सागर गुजर यांच्या उपस्थितीत रविवारी दि. १९ मार्च २०१७ रोजी झाले. ●

**एक व्यक्ती - एक झाड**

**झाडे लावा - देश वाचवा**

महाराष्ट्रातील जास्तीत जास्त जैन समाजापर्यंत पोहचण्याचा सर्वांत खात्रीशीर, सर्वांत सोपा व सर्वांत स्वस्त मार्ग...

जैन जागृति